महाराष्ट्र वन विभाग

**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती यांचे कार्यालय**

**कॅम्प, अमरावती - 444 602**

कार्यालयीन दुरध्वनी 2662090 / 2662593. 2662680 (वैयक्तिक), फॅक्स- 2663314
वनसंपर्क दुरध्वनी (निःशुल्क) 155314 (फक्त लँड लाईन वरुन संपर्कासाठी)
ई-मेल-पत्ता- ccftamravati@mahaforest.gov.in / aticcfa@gmail.com

# परिपत्रक

विषय :- महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २९ अंतर्गत शासकीय कर्मचा-यांच्या (औद्योगिकेत्तर) संघटनाना शासन मान्यता नसल्यास त्यांची निवेदने, विज्ञापने विचारात न घेण्याबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक:संघटना१५१६/प्र.क्र.२७३/२०१६/१६-अ, दिनांक ०२ जानेवारी, २०१७.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ चे कलम २९ व ३० मधील तरतूदी खालील प्रमाणे आहे-

***(29) Recognition of associations- (1) Government may, after such inquiry as it deems fit, grant recognition to an association of Government servants, if in the opinion of Government, such association has complied with the conditions specified in Appendix.***

***(2) An association to which recognition is granted under sub-rule (1) shall be recognized association.***

***(30) An association which is not a recognized association shall not be entitled to submit any representation or memorial or send any deputation in respect of any matter affecting Government servants or a class of such servants.***

२. तथापि, नियम २९ खाली शासन मान्यता प्राप्त नसलेल्या संघटनांकडून वेळोवेळी निवेदने प्राप्त होत असतात. यावर प्रतिबंध घालण्यासाठी संदर्भीय शासन परिपत्रकामध्ये विस्तृत दिशा निर्देश देण्यात आलेले असून शासन मान्यता प्राप्त संघटनाची यादी उक्त परिपत्रकासोबत सहपत्रित आहे. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाचे **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१७०१०२१२२३१७०८०७ असा आहे.

३. उक्त परिपत्रकात शासनाने पुढील प्रमाणे निर्देश दिलेले आहे-

*जिल्हाधिकारी कार्यालये, क्षेत्रिय कार्यालये यांचेकडे संघटनांनी निवदेने प्राप्त झाल्यास त्या संघटनांच्या लेटरहेडवर शासन मान्यता प्राप्त असल्याचा सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १६-अ द्वारा निर्गमित शासन आदेशाचा क्रमांक व दिनांक स्पष्ट नमूद केल्याखेरिज त्यांच्या पत्रव्यवहाराची वा शिष्टमंडळाची दखलही घेण्यात येऊनये.*

४. सबब संदर्भीय शासन परिपत्रकाद्वारे शासनाने दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन व्हावे.

५. शासन मान्यता नसलेल्या संघटनांकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या निवेदनावरुन (Letterhead) दिसून येते की, ब-याचशा शासकीय सेवकानीही अशा संघटनांचे सदस्यत्व स्विकारलेले आहे. सबब असे निर्देश देण्यात येत आहे की, कोणताही शासकीय सेवक हा शासन मान्यता नसलेल्या संघटनाशी सलंग्न आढळून आल्यास, तो शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र ठरेल.

६. खालील स्वाक्षरीकर्ते यांचे असेही निदर्शनास आले आहे की, ब-याचशा वेळी अशा शासन मान्यता नसलेल्या संघटन शासकीय सेवकांना संप व धरणेसाठी प्रवृत्त करतात. यासंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ चे नियम ६ कडे लक्ष वेधण्यात येत आहे.

**(6) Demonstration and strikes : No Government servant shall-**

***(i) engage himself or participate in any demonstration which is prejudicial to the interest of the sovereignty and integrity of India, the security of the State, friendly relations with foreign States, public order, decency or morality, or which involves contempt of court, defamation or incitement to an offence; or***

***(ii) resort to, or in any way abet, any form of strike in connection with any matter pertaining to his service or the service of any other Government servant:***

***Provided that, nothing in this sub-clause shall be deemed to be prohibit those Government servants from resorting to any strike who are expressly permitted to resort to such a strike under any law for the time being in force.***

७. उक्त वैधानिक तरतूदी विचारात घेता, एखादा शासकीय सेवक शासनाचे विशिष्ट परवानगी असल्याशिवाय संपात सहभागी झाल्यास किंवा इतर शासकीय सेवकांना संपात सहभागी होण्यास प्रवृत्त करत असल्याचे आढळून आल्यास तो शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र ठरेलच, शिवाय त्यांनी संपात व्यतीत केलेला कालावधी हा सेवेत खंड म्हणून ग्राहय धरल्या जाईल.

८. या संदर्भात असेही निदर्शनास आणण्यात येत आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा निवृत्त) नियमावली १९४२ चे नियम ४८ अनुसार सेवेत पडलेला खंड क्षमापित करण्याचे अधिकार नियुक्त प्राधिकरणाला देण्यात आलेले आहेत. तथापि, पोट नियम-४ अनुसार संपात सहभागी होण्याचा कालावधी क्षमापित होणे मुळीच पात्र नाही.

९. वरील संदर्भाद्वारे शासनाचे दिशानिर्देश व उपरोक्त सूचनांचे उल्लंघन होणार नाही, याची सर्व शासकीय सेवकांनी दक्षता घ्यावी.

3/2/2017

(संजीव गौड)
मुख्य वनसंरक्षक
(प्रादेशिक), अमरावती

**क्रमांक मुवसंप्रा/कक्ष-८/आस्था/परि./३०९४/२०१६-१७**
**अमरावती दि. ०३ फेब्रुवारी, २०१७**
**प्रति,**
**उप वनसरक्षक, अमरावती/बुलडाणा/पूर्व मेळघाट/पश्चिम मेळघाट.**
**अमरावती वनवृत्तातील सर्व सहाय्यक वनसंरक्षक.**
**अमरावती वनवृत्तातील सर्व वनपरिक्षेत्र अधिकारी.**
**अमरावती वनवृत्तातील सर्व वनपाल आणि वनरक्षक.**
**अमरावती वनवृत्ताच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेले सर्व संवर्गातील शासकीय सेवक.**
**www.ccftamt.gov.in आणि www.mahaforest.gov.in संकेतस्थळ**

**प्रतिलिपी** :सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
:प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
:मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
:वनसंरक्षक, कार्य आयोजना विभाग, अमरावती.
:वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त,अमरावती.
:अमरावती सामाजिक वृत्तातील सर्व उपसंचालक.

03/02/2017

(संजीव गौड)
मुख्य वनसंरक्षक
(प्रादेशिक), अमरावती